**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**

सायं • दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

फक्त ५१०००/- रु.

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूमची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ७० वा | शुक्रवार दि. ०३ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कोल्हापूरचा शाही दसरा ऐतिहासिक थाटात साजरा



राजेशाही मिरवणुकीतून कोल्हापूरच्या लोकसंस्कृतीचे दर्शन; सोने लुटण्यासाठी करवीरवासीयांची अभूतपूर्व गर्दी

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** विजयादशमीच्या पावन पर्वानिमित्त कोल्हापूरच्या ऐतिहासिक दसरा चौकात मावळत्या सूर्याच्या साक्षीने शाही दसरा उत्सव मोठ्या उत्साहात आणि राजेशाही थाटात पार पडला. म्हैसूरनंतर देशातील सर्वात मोठा आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेला हा दसरा उत्सव कोल्हापूरच्या वैभवशाली सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारा ठरला. 'सोने लुटणे' या परंपरेसाठी हजारोंच्या संख्येने करवीरवासीयांनी हजेरी लावत अभूतपूर्व उत्साह दाखवला.

**राजेशाही थाट आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम**

कोल्हापूरच्या शाही दसरा उत्सवाला प्रमुख राज्य उत्सवाचा दर्जा असून, गेल्या दहा ते बारा दिवसांपासून जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. असुरांचा संहार करून भक्तांना अभय देणाऱ्या दुर्गा देवीच्या नवरात्रोत्सवाची सांगता या शाही दसरा सोहळ्याने झाली. विजयादशमीच्या निमित्ताने दसरा चौकात पारंपरिक पद्धतीने शमी पूजन पार पडले.

करवीर निवासिनी अंबाबाई व तुळजाभवानी देवींच्या पालख्यांसह भालदार, चोपदार, घोडेस्वार आणि शाही लवाजम्यासह निघालेली मिरवणूक कोल्हापूरच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणारी ठरली. मार्गाच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी पुष्पवृष्टी करत या मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**राजघराण्याची उपस्थिती आणि शाही सलामी**

सायंकाळी सहाच्या सुमारास न्यू पॅलेस येथून गाड्यांच्या ताफ्यासह मेबॅक मोटारीतून खासदार शाहू महाराज, माजी खासदार

(पान २ वर)

# गांधी जयंतीनिमित्त सर्वधर्म प्रार्थना

**विविध धर्मगुरूंनी सादर केल्या प्रार्थना; गांधीजींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन**

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयाशेजारील उद्यानात महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर सर्वधर्म प्रार्थना कार्यक्रम श्रद्धेने व शांततेच्या वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महात्मा गांधी यांनी दिलेल्या सत्य, अहिंसा, बंधुता व सर्वधर्म समभावाच्या विचारांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विविध धर्मांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या धर्मगुरूंनी आपापल्या धर्मानुसार प्रार्थना सादर करत राष्ट्रपिता महात्मा गांधी



यांच्या विचारांना मानवंदना दिली. सर्वधर्म प्रार्थनेतून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि शांततेचा संदेश उपस्थितांना देण्यात आला.

कार्यक्रमात महात्मा गांधी स्मारक समितीचे सचिव **देवराज सिंग** यांनी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी **आमदार अमिन पटेल** यांनीही गांधीजींच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करत विनम्र आदरांजली वाहिली.

तसेच महात्मा गांधी स्मारक समितीच्या सदस्य सुमन पवार, प्रो.अमरसिंग यांच्यासह अनेक विद्यार्थी, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही उपस्थित राहून महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण केले. उपस्थितांनी गांधीजींच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या मार्गावर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

हा कार्यक्रम शांतता, ऐक्य आणि सहिष्णुतेचे प्रतीक ठरला असून, महात्मा गांधी यांच्या विचारांची आजच्या काळात असलेली उपयुक्तता अधोरेखित करणारा ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591

# दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालयात भोंगळ कारभार?

## सुदर्शन सलगरांची चौकशीची मागणी

**मंगळवेढा(कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील शिक्षण प्रसारक मंडळाच्या दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालयाविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप करत सुदर्शन तुकाराम सलगर (रा. कामती खुर्द, ता. मोहोळ) यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागासह विविध शासकीय विभागांकडे चौकशीची मागणी केली आहे.

सलगर यांनी दिनांक १० मार्च २०२५ रोजी तक्रार अर्ज सादर केला होता. त्यावर मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०७ एप्रिल २०२५ रोजी पत्रव्यवहार केला. मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे सलगर यांनी या संदर्भात आक्रमक भूमिका घेतली आहे.

**मुख्य आरोप काय आहेत?**

**१. कार्यालयीन कामकाजात गंभीर अनियमितता:** महाविद्यालयात दिशाहीन व बोगस कारभार चालू असून, खात्रीशीर माहिती आणि दस्तऐवजांची उणीव आहे. महाविद्यालयाचे कार्यालयीन व्यवस्थापन पारदर्शक नसल्याचा आरोप आहे.

**२. माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन:** सलगर यांनी विविध विभागांकडे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, मागासवर्ग कक्ष (पुणे), उच्च शिक्षण विभाग (सोलापूर) यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत रोस्टर, प्रयोगशाळा साहित्य, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कर्मचारी तपशील अशी माहिती मागवली होती. संबंधित विभागांनी



माहिती संस्थेकडे वर्ग केली, परंतु संस्थेकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

**३.खोटे रोस्टर व माहिती लपवण्या-चा आरोप:** विद्यापीठाकडून ब्लॅक फॉर्ममध्ये रोस्टर प्राप्त झाले, मात्र त्यात कर्मचारी नावांचा उल्लेख नाही. यामुळे माहिती लपवण्याचा आरोप झाला आहे.

**४.प्राचार्य व संस्थेच्या अध्यक्षांमध्ये विरोधाभास:** प्राचार्य डॉ. आर. एस. गायकवाड यांनी ''संस्थेकडे सचिव नाही'' असा लेखी पत्राद्वारे दावा केला असताना, संस्थेच्या लेटरपॅडवर अध्यक्ष ॲड. सुजित एस. कदम यांनी सचिव पद अस्तित्वात असल्याचे स्पष्ट केले आहे. हा विरोधाभास गंभीर असून संस्थेच्या व्यवस्थापनावर संशय निर्माण करणारा आहे.

**५.आरक्षण धोरणाचा भंग:** मंजूर पदांप्रमाणे आरक्षण रोस्टर न दिला जाणे, सरळ सेवा व पदोन्नतीतील अनुशेषांची माहिती न देणे, तसेच संवर्गनिहाय रेकॉर्ड न ठेवणे हे सगळे घटक आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीतील दुर्लक्षाचे निदर्शक आहेत.

**सलगर यांची प्रमुख मागणी**

संस्थेतील कार्यालयीन कामकाजाची सखोल चौकशी,माहिती अधिकारांतर्गत मागवलेली सर्व माहिती त्वरित उपलब्ध करणे, संस्थेतील बेकायदेशीर कारभारावर तात्काळ कार्यवाही करणे, शासन निर्णयांचे पालन होत नसेल, तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करणे.

सलगर यांनी मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त, मुंबई, पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण सहाय्यक पोलीस निरीक्षक, कामती पोलीस स्टेशन या संबंधित विभागांना तक्रारीची प्रत पाठवली आहे.

सदर तक्रार अर्जदाराच्या तक्रारीबाबत संस्था, अध्यक्ष ॲड सुजित कदम यांना आमचे प्रतिनिधींनी खुलासा विचारला असता, त्यांनी असे नमूद केले की, संस्थेत संस्था संचलित दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय या महाविद्यालयामध्ये जी पदभरती झालेली आहेत. ती शासन निर्णयानुसार व कायदेशीर सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून केलेली आहे. यामध्ये कोणतेही बोगस व अनधिकृत पदभरती झालेली नाहीत. संस्था व महाविद्यालयाच्या महाविद्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचा भोंगळ व अनागोंदी कारभार नाही. सदर तक्रार अर्जदार हे संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेचे कर्मचारी नाहीत. त्यांचा संस्थेशी संबंध नाही ते अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याकडे संपर्क साधून काही खंडणी मिळते का हे पहात आहेत. व त्यांचा तो हेतू असल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यांनी यापूर्वीही अनेक महाविद्यालयाकडे अशा प्रकारचे माहिती अधिकाराखालील अर्ज दाखल करून पैसे उचलल्याचे समजले आहे. त्यामुळे आम्ही सदर तक्रारदार सुदर्शन सलगर यांचे विरुद्ध त्यांनी आमच्या संस्थेची व महाविद्यालयाची बदनामी केले बाबत त्यांचे विरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा मानस व्यक्त केला.

# संपादकीय

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी चिमुकल्यांचे दातृत्व

मागील काही दिवसात पर्यावरण बदलामुळे, समुद्रावरील दाबाच्या अनियंत्रित पट्ट्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढला. तसा सोलापूर जिल्ह्यातही सर्वदूर पाऊस झाला.पाहता पाहता नद्या,नाले,ओढे,तळी तुडुंब भरुन वाहू लागले. नद्या धोक्याच्या पातळ्या ओलांडू लागल्या. शेताशेतात पाणी साचू लागले. उभे पीक हळूहळू नासू लागले.वाहू लागले.काही समजण्याच्या आत संततधारेने नदीला पूर आला.काही भागात मानवी वस्तीत पाणी घुसले. डोळ्यांदेखत गाई, म्हशी, शेळ्या पूराच्या लोंढ्यात वाहून गेले. अनेक ठिकाणी मातीसहीत पीके वाहून गेल्याची उदाहरणे पहायला मिळाली. संयमी शेतकऱ्यांच्या मागची संकटांची मालिका संपता संपेना अशी अवस्था झाली. घरातील भांडी वाहून गेली, कपडेलत्ते, कागदपत्रे, वाहने, धनधान्य, दाळीदुळी, पीठमीठ सारंच्या सारं जलमय झालं. अनेकांनी जीवाच्या आकांताने सारं काही जिथल्या तिथं ठेवून उपलब्ध आश्रयाकडे धाव घेऊ लागले. यापासून शाळा, वर्गखोल्या, दुकानेही वाचली नाहीत.हवामान विभागाचा रेड अलर्ट ह्दयाचे ठोके वाढवू लागला. होत्याचं नव्हतं होताना साऱ्यांच्या जीवाची घालमेल होऊ लागली. पूराच्या झळा सोसणाऱ्या पूरग्रस्तांच्या डोळ्यातील अश्रु वाट मोकळी करु लागले.

पुढारी व मंत्री पूरबाधीत क्षेत्राला भेट देऊ लागले. सर्वतोपरी मदतीचे आश्वासन देऊ लागले. शासन सोबत असल्याचा आधार देऊ लागले. शेतकऱ्यांच्या दुःखाला आपलं दुःख मानून अधिकारी व प्रशासन कामाला लागले. समाजाप्रती संवेदना असणाऱ्या समाजसेवी संस्था, माणसे, संघटना, गणेश मंडळे, मंदीर ट्रस्ट, पतसंस्था, शिक्षक, डॉक्टर आदी मदतीसाठी धावू लागले. आवश्यक असलेली, शक्य असलेली मदत आपापल्या परीने पोचवू लागले. कुणी धान्याची सोय केली, कुणी साड्या, कपड्यांची सोय केली. कुणी शैक्षणिक साहित्य पुरविले तर कुणी चादरी, ब्लँकेट पाठविले. पूरग्रस्तांच्या दुःखाचा भागीदार होण्यात सर्वजण धन्यता मानू लागले. यात संवेदनशील मुले मागे राहतील कशी? थेट जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन पाच वर्षाचा ध्रुव बालाजी लोहकरे, स्वराज गोपाळ सुरवसे, जि.प.प्राथ.शाळा, मोडनिंब नं १ चा ज्ञानेश रविंद्र देबडवार, जि.प.प्राथ.शाळा, गायकवाडवस्ती केंद्र वरवडे ता.माढा येथील विद्यार्थी यांच्यासह अनेकांनी स्वतःच्या बचतीतून जमा केलेले पैसे खारीचा वाटा म्हणून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जमा केले. या चिमुकल्यांनी दाखवलेले औदार्य समाजाप्रतीची संवेदना आधोरेखीत करणारे आहे.समाजऋण फेडण्याची बालमनाची भक्कमता समाधान देणारी वाटली.माझे ते माझे किंवा तुझे ते माझे न म्हणता माझेही तुझेच आहे असा विश्वास या कृतीतून दिसून आला.शेतकऱ्यांच्या दुःखाचे हे चिमुकले भागीदार पाहून उद्याच्या संकटांना सर्वांनी मिळून तोंड देण्याचे सामर्थ्य मिळाले हे मात्र खरे!

✻ पान १ वरुन ✻

**✻ कोल्हापूरचा शाही दसरा ऐतिहासिक थाटात साजरा.....**

युवराज संभाजीराजे छत्रपती, माजी आमदार युवराज मालोजीराजे, शहाजीराजे व यशराजे यांचे दसरा चौकात आगमन झाले. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. भालदारांनी ललकारी देत शाही सलामी दिली, तर पोलिस बँडच्या तालावर करवीर संस्थानचे मानगीत गायले गेले.

यानंतर सरदार व मानकऱ्यांचे मुजरे स्वीकारून राजघराण्यातील सदस्य स्थानापन्न झाले. पांढऱ्या रंगाच्या भव्य शामियानात सरदार, मनसबदार, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शमी पूजन व 'सोने लुटणे' ठरले आकर्षणाचा केंद्रबिंदू**

दसरा महोत्सव समितीच्या वतीने राजघराण्याचे स्वागत झाल्यानंतर राजपुरोहितांच्या पौरोहित्याखाली शमी पूजनाचा विधी पार पडला. त्यानंतर बंदुकीच्या फैरी झाडून अंबाबाई देवीला शाही सलामी देण्यात आली. यानंतरचा सोने लुटण्याचा कार्यक्रम हा शाही दसऱ्याचा कळस ठरला. 'सोनं घ्या सोन्यासारखं रहा' अशा शुभेच्छा देत आपट्याची पाने लुटण्यासाठी नागरिकांनी अक्षरशः झुंबड उडवली. लुटलेले सोने राजघराण्यातील सदस्यांना देण्यासाठीही मोठी गर्दी उसळली.

या शाही सोहळ्याला सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक, आमदार सतेज पाटील, जयंत आसगावकर, राहुल आवाडे, अशोक माने, जिल्हाधिकारी अमोल येडगे, महापालिका प्रशासक के. मंजूलक्ष्मी, पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह कला, क्रीडा, उद्योग, शिक्षण व प्रशासन क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच सरदार, इनामदार घराण्यांचे मानकरीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भवानी मंडप ते दसरा चौक या मार्गावर निघालेल्या राजेशाही मिरवणुकीत देवींच्या पालख्यांसह कोल्हापूरच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडले. मावळ्यांच्या वेशातील घोडेस्वार, धनगरी ढोल, महिलांचे लेझीम, रणमर्द मावळ्यांची पथके, पोवाडे, पारंपरिक पालख्या यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या मिरवणुकीत कोल्हापूर जिल्ह्यातील ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला असून, त्यांना मिरवणुकीत मानाचे स्थान देण्यात आले होते. याशिवाय तालमींचे कुस्तीगीर, खेळाडू सहभागी झाले होते, तर रस्त्याच्या दुतर्फा एनसीसी व स्काऊट-गाईडच्या विद्यार्थिनी शिस्तबद्धरीत्या उभ्या होत्या.

या भव्य मिरवणुकीचे उत्कृष्ट नियोजन जिल्हा प्रशासनाने केले होते. पोलिस प्रशासनाच्या काटेकोर बंदोबस्तामुळे हा शाही दसरा उत्सव कोणताही अनुचित प्रकार न होता शांततेत व उत्साहात पार पडला. या सोहळ्याने कोल्हापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजेशाही परंपरेची उज्ज्वल परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली.

प्रबोधन

# पितरांची पूजा। संप्रदाय थोर

मूर्खलक्षणं सांगताना सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख, असं जरी रामदासांनी म्हटलं असलं, तरी ते मातृपितृभक्तांविषयी मात्र धन्योद्गार काढतात. हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. ते लिहितात, धन्य धन्य ते प्रपंची जन। जे मायबापांचे भजन।करिती, न करती निष्ठुर मन जिवलगांशी ।। पितृभक्तीसाठी राजसी ऐश्वर्यभोग आणि निश्चिंत जीवनाकडे पाठ फिरवून अरण्यवासाचे कष्ट आनंदाने स्वीकारणारा राम हा रामदासांचं आराध्य दैवत असल्यामुळे रामाच्या पितृभक्तीतून त्यांनी प्रेरणा घ्यावी आणि मातृ- पितृविषयक श्रद्धेचं समाजातील अधिष्ठान मजबूत करावं, हे सारे तर्कसंगतच आहे. माता- पिता हे प्रत्येकाच्या जीवनाचे निर्मिक असतात. हे जैविक, भौतिक आणि ऐहिक सत्य त्रिकालाबाधित आणि परिपूर्ण सत्यही आहे. महाभारतामध्येही पित्याविषयीचा यथोचित सन्मान शब्दबद्ध झालेला दिसून येतो. महाभारतकार म्हणतात, पिता हा धर्म आहे, तो स्वर्ग आहे, तो श्रेष्ठ तप आहे. तो प्रसन्न झाला असता सर्व देवता संतुष्ट होतात. प्रस्तुत विधानातील स्वर्ग, देवता हे शब्द खोटे-फसवे आहेत. पण त्याचा तात्पर्यार्थ समजून घ्यायला हरकत नाही. सारांश, पितृपूजा किंवा पितरपक्षातील पूर्वजस्मरण हा कृतज्ञतेने परिपूर्ण असा अमूल्य संस्कार असून कोटी कोटी काल्पनिक देवांच्या पूजनापेक्षा श्रेष्ठ आहे.

सामान्य भोळेभाबडे, निर्बुद्ध, अंधविश्वासू भक्त-भाविक देवाला स्वामी म्हणतात, समर्थ म्हणतात. त्वमेव माता पिता त्वमेव अर्थात, तूच माझी माता तूच माझा पिता म्हणतात. अशा दीड शहाण्यांना नजरेसमोर असलेला सर्वश्रेष्ठ पिता श्रद्धेचा विषय वाटत नाही. पण आकाशातील न दिसणाऱ्या देवबाप्पाचं कौतुक त्यांना वाटावं, हे त्यांचं घोर अज्ञान! भक्तश्रेष्ठ पुंडलिक हा आई-वडिलांमध्येच पांडुरंगाचं दर्शन करणारा थोर सुपुत्र होता. म्हणून भक्त पुंडलिकाचा अंतरंग परिचय देताना मला भक्त पुंडलिक, भक्त ना देवाचा। पितृसेवकांचा आदर्श तो ।। असा गौरव करावासा वाटतो. पांडुरंग पुंडलिकाची वाट पाहून त्याच्या दारी आल्यावरसुद्धा आई-वडिलांचे पाय दाबत बसलेल्या पुंडलिकाने पांडुरंगाकडे वीट भिरकावली, अशी कथा आहे. ही कथा काल्पनिक आहे. पण पुंडलिक मात्र थोर मातृपितृभक्त सिद्ध झाला म्हणून वारकऱ्यांनी का रे पुंड्या मातलासी, उभे केले विठ्ठलाशी असं तुकाराम महाराजांप्रमाणे न म्हणता मातृपितृसेवेचा त्याचा आदर्श घेऊन आपलं आयुष्य सार्थकी लावणं गरजेचं आहे. एक विचारवंत म्हणतात, आई-वडिलांविषयी कृतज्ञताभाव ही संस्कृतीची कोनशीलाच होय. म्हणून जगात जे जे पितरपूजक आहेत, ते सारे वंदनीय तर आहेतच, पण अनुकरणीयही आहेत. वर्षभरातील सणवार उत्सव आनंद देत असतील. पण पितृपक्षाचा कृतज्ञभावनेचा संस्कार त्या आनंदाहून फार थोर आहे.

स्वामी विवेकानंद हे सतत विचार मंथनात मग्न असत आणि परंपराबद्ध न होता चिंतन करीत. त्यांनी आपल्या वडिलांना एकदा विचारलं, तुम्ही माझ्यासाठी मागे काय ठेवलं? त्यांना वडील म्हणाले, आरशापुढे उभा राहा आणि पाहा. मी तुला काय दिलं, ते तुझं प्रतिबंब तुला सांगेल! अत्यंत मर्मस्पर्शी आणि मूलभूत असं हे जीवनाचं तत्त्वज्ञान; ईश्वरीज्ञान किंवा आत्म्याच्या ज्ञानासारखं पोकळ नाही. या ज्ञानाचा पाया चिरस्थायी आणि वादातीत आहे. भारतमातेच्या थोर सुपुत्राची, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कर्तृत्वाची दिशा निश्चित केली, त्यांच्या वडिलांनी केलेल्या उपदेशाने. हे विद्याप्रेमी वडील आपल्या मुलाला म्हणायचे, तू गरीब राहिलास तरी चालेल, पण विद्यावंत हो, शीलवान हो. ज्ञान आणि चारित्र्य हीच खरी शक्ती! वर्ण्यवर्चस्ववाद्यांनी कनिष्ठ जातीचे ठरवलेल्यांमध्ये डॉ. आंबेडकरांनी जी युगपरिवर्तनकारी क्रांती घडवून आणली, तिचं प्रकटन वडिलांच्या उपदेशातून झालं होतं.

पितृपक्ष हा असा प्रेरणादायक नक्कीच आहे. मात्र केवळ घराच्या छपरावर कावळ्यांना भात-वरण खाऊ घालणं म्हणजे पितरांविषयी कृतज्ञता व्यक्त करणं नव्हे. आपल्या घराण्यातील पूर्वजांनी जीवनाची जी शृंखला आपणापर्यंत आणून पोचवली, तिची जाणीव ठेवण्याची आणि ती भविष्याच्या हाती उत्साहपूर्वक सोपवण्याची आपली जबाबदारी लक्षात घेण्याचा हा पंधरवडा. सनातनी आर्य संस्कृतीने पितृ पक्ष शुभकार्यांना वर्ज्य म्हणण्याचा आचरटपणा केला असेल; पण जी माणसं भक्त पुंडलिक, स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर यांना थोर पुरुष मानतात; त्यांनी सर्व महत्त्वाच्या संकल्पांचा शुभारंभ या पक्षातच करणं आवश्यक आहे. नाही तरी अमावस्या पौर्णिमा । जाऊ नये कोणत्याही कामा असं भट-ब्राह्मण सांगत असतानाही छत्रपती शिवरायांनी अनेक मोहिमा, स्वाऱ्या, छापे यांचा प्रारंभ अमावास्येलाच केला, आणि त्यांनी विजयश्रीही खेचून आणली, असं इतिहासकार म्हणतात. आपले पूर्वज जेथे थांबले, तेथून पुढे जाण्याचा संकल्प करण्यासाठी, पितृपक्षासारखा पक्ष नाही. एवढं जरी आपण समजून घेतलं, तरी पुष्कळ झालं. तेव्हा लक्षात ठेवा-

मातृपितृसेवा । पुंडलिक करी
केली नाही वारी । कधी त्याने ।।१
गुंडाळून देव। बाजूस सारले
दैवत मानले। माता-पिता ।।२
देवाने जन्माला घातले न कुणा
भक्तांनो कल्पना । त्यागा आता ।। ३
मातापित्यामुळे । जगी आम्ही आलो
मानव जाहलो। धन्य धन्य ।।४
कर्ज पितरांचे। फिटणार नाही
कसे उतराई । व्हावे त्यांचे ।।५
माणसांचे करू। कल्याण चिंतन
पूर्ण समाधान। लाभण्यास ।। ६
पितरांची पूजा। संप्रदाय थोर
उदंड प्रसार। व्हावा त्याचा ।।७
होऊ या मानव। पुजू या मानव
वंदू या मानव। मनोभावे ।। ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# खराब हवेचा आरोग्यावर परिणाम

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे. मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे.

मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात प्रामुख्याने सांगता येण्यासारखे कारणे म्हणजे वाढते औद्योकीकरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे ही आहेत. मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत.

मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे.

मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो. चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिति जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील.

मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा. नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

**श्याम ठाणेदार, दौंड, जि.पुणे. ९९२२५४६२९५**

प्रबोधन

# गांधीजींचा मार्ग । आहे कल्याणाचा

महात्मा गांधीजींचं व्यक्तिमत्त्व अष्टपैलूच नव्हे; तर शतपैलू, सहस्रपैलू होतं. त्यामुळे त्यांच्याकडे लहान मुलं आकर्षित व्हायची. आठ-दहा वर्षांचा एक छोकरा समुद्रकिनारी काठीचं एक टोक पकडून पुढे पळतो आहे आणि त्या काठीचं दुसरं टोक पकडून गांधीजी त्या मुलामागून धावताहेत, हे चित्र म्हणजे रेषांनीयुक्त चित्रबद्ध एक कविताच आहे. गांधीजींकडे फाटक्या कपड्यांतील दरिद्री नारायणही यायचे आणि बिर्ला-बजाजसारखे नवकोट नारायणही आकर्षित व्हायचे. रवींद्रनाथ टागोरांसारखे विश्वकवी आणि वयाच्या बाराव्या वर्षी बाराशे ओळींचं इंग्रजी काव्य लिहिणाऱ्या सरोजिनी नायडूही आकर्षित व्हायच्या. गांधीजी शुद्ध राजकारणी असते, तर त्यांच्यावर कोणाही भारतीय कवीने कविता लिहिली नसती. पण महात्माजींचं व्यक्तिमत्त्व, कार्य, विचार, काव्यबद्ध करण्याचं, गौरवण्याचं कार्य साऱ्या भारतीय कवींनी आदरपूर्वक, प्रेमपूर्वक केलं आहे. कारण गांधीजींचं व्यक्तिमत्त्व बहुआयामी, चित्ताकर्षकच नव्हे; तर उल्हासवर्धकही होतं, स्फूर्तिदायक होतं.

कविवर्य भा. रा. तांबे यांनी गांधीजी म्हणजे चिलयाबाळ, प्रल्हादबाळ आणि हरिश्चंद्र यांचं एकवटलेलं व्यक्तिमत्त्व असं म्हटलं. सत्याचा अवतार या कवितेत भा. रा. तांबे भारतमातेला उद्देशून लिहितात-

ह्या बाळांचा आत्मा पसरे ।
युगांतरी तो आता उतरे ।
एकवटूनी मोहनी अवतरे ।
तू वांझ न गे माझी माता ।।

कवी माधव ज्युलियन यांनी महात्मा काय करिल एकला? असं प्रश्नार्थक शीर्षक देऊन लिहिलेल्या कवितेत भारतपुत्रांना महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होण्याचं आवाहन एका बाजूने केलं; तर दुसऱ्या बाजूने महात्माजींचा अद्वितीय थोरपणाही व्यक्त केला आहे. ते आपल्या प्रदीर्घ कवितेत म्हणतात-

न लगे शिष्य-प्रपंच,
होणे गुरू वा पैगंबर ।
मानवी किती थोर अंतर ।।
धर्मवेड कधी मनास न शिवे,
धन्य खरा वैष्णव ।
वाढवी सत्याचे वैभव ।
कृपण भ्याड ती क्रियाशून्यता ।।
तो न अहिंसा गणी ।
पाहिजे धैर्य आणि लागणी ।
उद्योगी, भिक्षू, शेतकरी, विणकर ।
दुबळ्यांचा प्रतिनिधी, कैवारी, चाकर ।
दे बलाढ्य साम्राज्यशाहीशी टक्कर ।
राजमान्यता, लोकमान्यता
यास न भाळे भला ।
महात्मा काय करिल एकला ? ।।

महात्माजींचा भारतसंचार चालू असताना आसामची एक चार दिवसांची उपाशी माता आपल्या तान्हुल्याला घेऊन गांधीजींचं दर्शन घेण्यासाठी आसामच्या भयानक जंगलातून धाव घेते. कवी वि.द. घाटे यांनी आपल्या तो पाहा महात्मा आला या कवितेतून त्या स्त्रीच्या मुखातून महात्माजींचं वर्णन करताना म्हटलं आहे- त्या कृश खांद्यावर, भार तेतीस कोटी दुःखाचा । त्या निश्चल निष्ठुर नेत्री, घोर आपुल्या अन्नाचा । मानेवर डोंगर थोर, हिंदूंच्या घोर गत पापांचा । हासरा परी तो अधर, हासवी द्वेष दैन्यांचा । त्या विशाल हृदयापाशी, आसरा गांजलेल्याशी । झुलु, महार वा मांगाशी । त्या आणण्यास चल बाळा, तो पहा महात्मा आला ।।

साने गुरुजींनी खरा हुतात्मा ही कविता त्रिचनापल्ली तुरुंगात असताना १९३१मध्ये लिहिली आणि गांधीजी १९४८ला हुतात्मा झाले. पण साने गुरुजींना एक दिव्य व्यक्तिमत्त्व अशा अर्थाने गांधीजींना संबोधायचं होतं. गांधीजींचं असाधारणत्व विशद करताना ते लिहितात-

होती जी मळी धुळीत पडली,
ती भारती संस्कृती ।
देवोनी उजळा तिला करी,
नवी वानू किती तत्कृती ।।
गांधी धर्मच, मूर्त सत्य,
गमती, धर्मार्थ तज्जीवन ।
गांधी प्रेमच मूर्त सत्य,
निर्मळ सदा प्रेमार्द्र त्यांचे मन ।।
गीता चालती बोलती मज गमे,
गीतार्थ त्यांची कृती ।

ऐसी थोर विभूती लाभत आम्हां भाग्यास नाही मिती ।। आपल्या दुसऱ्या एका महात्माजीस ह्या कवितेत तर महात्माजींना देवत्व देताना ते म्हणतात- राष्ट्रा जागविले तुम्ही प्रभू खरे पाजूनिया अमृता ।।

कवी बा.भ.बोरकर तर महात्माजींच्या पायाची धूळ होण्याची इच्छा व्यक्त करतात. जगातील कोणत्याही नेत्याच्या वाट्याला एवढा आदर, एवढा सन्मान आला नसेल. कवी म्हणतात-

प्रभू तुमचे दर्शन घडले, झडले पाप ।
अन्? क्षणी युगांचा, जाणवला अनुताप ।
ते भाग्य पथाचे द्या हो, या जीवाला ।
तुडवोत तया मग सुखे, व्याप संताप ।
कवीला महात्माजी कसे दिसले?-
ती मूर्ती साजिरी, कांती कर्पूरगौर ।
ऋतू शांति अंहिसा दलित स्फूर्ति गंभीर ।
गंगेपरी गेलो पुढुनी, संथ गतीने ।
निःशब्द प्रीतिने जिववुनि, दोन्ही तीर ।।
कवी ग. ह. पाटील म्हणतात, वसुंधरेवर खरा
तू मानव, जिंकिले दानव अहिंसेने ।।
कवी भवानीशंकर पंडित लिहितात-
नव हिंदराष्ट्र हे याचा तू निर्माता ।
तू सत्य-अहिंसा-रतप्रति गौतम बुद्ध ।
तव जीवन म्हणजे सविनय सत्य-प्रयोग।
महात्माजींच्या जीवनाचा संदेश स्पष्ट
करताना कवी मंगेश पाडगावकर म्हणतात-
धर्म आमुचा विश्वबंधुता ।
कर्म आमुचे शुचिता, समता ।
परमविरागी असून आम्ही अनुरागाचे प्राण ।
आमुचे जीवन मंगल गान ।।

गांधी; एक युगमुद्राही कविता लिहिणारे बाबा आमटे म्हणतात- गांधी माहात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाही । आणि उद्याच्या पिढ्यांना त्याची ओळख पटण्यासाठी। क्वचित कॉम्प्युटर लागेल । पण काळाच्या भाळावर उमटलेली । ही एक तप्तमुद्रा । कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही ।।

कवी नामदेव ढसाळ म्हणतात,
सूर्यफुले हाती ठेवणारा फकीर
हजारो वर्षांनंतर लाभला ।
आता सूर्यफुलासारखे
सूर्योन्मुख झालेच पाहिजे ।

लोककवी मनमोहन यांनी आपल्या कवितेतून महात्मा गांधीजींचं अलौकिक व्यक्तिमत्त्व शब्दबद्ध करताना म्हटलंय-

चंदनाचे खोड लाजे हा झिजे त्याहूनही ।
सत्य मानी देव आणि झुंजला खोट्यासवे हा ।
ना करी तलवार होती। हा अहिंसेचा पुजारी।
रंगला रंकासवे हा झुंजला राजासवे हा ।
दोन हातांचा परंतु । देव याला मानिताती ।।

बापूजींच्या जयंतीदिनी (जन्म २ ऑक्टो. १८६८; मृत्यू ३० जाने. १९४८) त्यांना विनम्र अभिवादन करताना लक्षात असू दे-

लढाई न करी । तरी राज्य घेई
गांधीसम नाही। वीर कोणी ।।१
अहिंसेचे शस्त्र । क्षमेचे हत्यार
नवे नरवीर। महात्माजी ।।२
काया-वाचा-मने। देशभक्त थोर
कंगालांचा घोर । त्यांच्या जिवा ।। ३
जगावे कसे ते । शिकवी जगाला
मानी जीवनाला । मोक्षाहून ।।४
जनसेवा हीच । त्यांची देवपूजा
आराध्य न दुजा । देशाविना ।।५
कामाविण क्षण । नाही घालविला
धडा सर्वा दिला । कष्टण्याचा ।।६
सत्याला पूजिले। मानून ईश्वर
युगमुद्रा थोर । महात्माजी ।।७
गांधीजींचा मार्ग। आहे कल्याणाचा
नवीन युगाचा । जगासाठी ।।८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदांवन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# आव्हानांवर मात करूया, आपत्तीग्रस्त बांधवांना नव्या उमेदीने उभे करूया मुख्यमंत्री फडणवीस

## विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिल्या शुभेच्छा, एकजुटीचा निर्धार व्यक्त

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** विजयादशमीच्या पावन पर्वाकडून प्रेरणा घेत राज्यातील नागरिकांनी सर्व आव्हाने व संकटांवर मात करावी, तसेच हे पर्व सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विजयादशमीसह धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्तही मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील जनतेला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील सध्याच्या परिस्थितीवर भाष्य केले. अलीकडील अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागांत अभूतपूर्व आणि बिकट परिस्थिती निर्माण झाली असून, या संकटाच्या काळात सर्वांनी एकजुटीने आपत्तीग्रस्त नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. शेतकरी, कष्टकरी आणि पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी सर्वतोपरी योगदान देत त्यांना पुन्हा नव्याने, आत्मविश्वासाने उभे करण्याचा सामूहिक निर्धार करूया, असेही मुख्यमंत्री म्हणाले.




मुख्यमंत्री फडणवीस यांनी विजयादशमीच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वावरही प्रकाश टाकला. ''विजयादशमी हा सण असत्यावर सत्याच्या, अन्यायावर न्यायाच्या विजयाचा संदेश देतो. या सणाकडून सकारात्मक ऊर्जा घेऊन आपण बिकट परिस्थितीवर मात करूया. अडचणींमधून मार्ग काढण्यात महाराष्ट्र नेहमीच पुढे राहिला आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते अनेक थोर नेत्यांनी आपल्याला संघर्ष, धैर्य आणि विकासाचा वारसा दिला असल्याचे सांगत, त्याच प्रेरणेतून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. ''आपल्या सर्वांच्या एकजुटीमधून महाराष्ट्राच्या विकासाची पताका डौलाने फडकत ठेवण्याचा निर्धार करूया,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त संदेश देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मचक्र प्रवर्तनाच्या माध्यमातून विश्वाला सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेची दिशा दिली. हा दिवस संपूर्ण मानवजातीसाठी चिरंतन प्रेरणादायी ठरो, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली.

# सणासुदीच्या काळात केंद्राकडून एक आगाऊ हप्ता म्हणून महाराष्ट्राला ६ हजार ४१८ कोटी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारने राज्य सरकारांना कराच्या वाटपाचा आगाऊ हप्ता जाहीर केला असून, त्याअंतर्गत महाराष्ट्र राज्याला ६ हजार ४१८ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. हे अग्रीम हस्तांतरण १० ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या नियमित मासिक कर हस्तांतरणाव्यतिरिक्त देण्यात आले आहे.



या निर्णयामुळे सणासुदीच्या काळात राज्याच्या आर्थिक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला असून, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सणासुदीच्या पार्श्वभूमीवर तसेच राज्याचा भांडवली खर्च वाढवण्यासाठी हा निधी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. याचबरोबर राज्यातील विविध कल्याणकारी आणि विकासात्मक योजनांना गती देण्यासाठी या निधीचा प्रभावी वापर केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे राज्य सरकारला आर्थिक नियोजन अधिक सक्षमपणे करता येणार असून, आगामी काळात पायाभूत सुविधा, विकास प्रकल्प आणि जनहिताच्या योजनांसाठी निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## टेंभुर्णी प्रा.आ.केंद्रांत 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियान



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुर्णी येथे १ सप्टेंबर २०२५ रोजी ''स्वस्थ नारी सशक्त परिवार'' अभियान राबविण्यात आले. यामध्ये महिलांच्या आरोग्य विषयी तपासण्या करण्यात आल्या तसेच गरोदर मातांच्या तपासणी करण्यात आले.

या शिबिरामध्ये स्त्रीरोगतज्ञ डॉ. मदन कांबळे तसेच दंतरोगतज्ञ डॉ. भोसले, त्वचारोग तज्ञ डॉ. मेनकुदळे व कान नाक घसा तज्ञ डॉ. माने यांचे सहकार्य लाभले. या आरोग्य शिबिरामध्ये एकूण ११९ महिलांनी लाभ घेतला, तसेच श्री काझी एस पी यांनी हिवताप, डेंगू, चिकनगुनिया, कीटकजन्य व जलजन्य आजाराबाबत सर्वांना माहिती दिली.

या आरोग्य शिबिरास वैद्यकीय अधिकारी डॉ. सरकाळे सर, डॉ. सायली माळी मॅडम, डॉ. खुणे मॅडम, क.सहाय्यक श्री रासकर, आरोग्य सहाय्यक श्री गरड , श्री काझी, आरोग्य सहायिका श्रीम. गायकवाड, श्री सुहास माळी, औषध निर्माण अधिकारी श्री. सावंत, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. हिलाले व श्री राऊत, महा लॅब चे श्री महानवर, आरोग्य सेविका श्रीम. वाघमारे, नगारे, वाडकर, जायभाय, श्री काशीद, आरोग्य सेवक श्री राठोड, श्री बंडगर, परिचर श्रीम. पवार, श्री कुंभार मामा व धनवे मामा इ.सर्व आरोग्य कर्मचारी तसेच सर्व आशा ताई उपस्थित होते.

तसेच सदर अभियान यशस्वी होने कामी टेंभुर्णी ग्रामपंचायत च्या सरपंच माननीय सौ सुरजाताई बोबडे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

## साहित्यीकांच्या प्रत्येक स्मारकांसाठी २५ एकर व १०० कोटीची मागणी

**आटपाडी (कटूसत्य वृत्त):-** आटपाडी तालुक्यातील साहित्यीकांच्या प्रत्येक ठिकाणच्या स्मारकांसाठी २५ एकर जागा आणि १०० कोटी रुपये द्यावेत, आणि शंभरावे अखिल मराठी साहित्य संमेलन पाच संमेलनाध्यक्ष देणाऱ्या आटपाडीत घ्यावे. या, आटपाडीचे ज्येष्ट पत्रकार सादिकभाई खाटीक यांनी जाहीररित्या केलेल्या मागणीचे ठराव आज शेटफळे येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आले.

मराठी भाषेचे आधुनिक वाल्मीकी, महाकवी ग . दि . माडगुळकर यांच्या १०७ व्या जयंतीदिना निमित्त शेटफळे येथे ग. दि. माडगुळकर स्मारक समिती शेटफळेच्या वतीने आज घेतल्या गेलेल्या ३३ व्या गदिमा पारावरील साहित्यीक मेळाव्यात अर्थात साहित्य संमेलनात सादिक खाटीक यांनी काल केलेल्या लक्षवेधी मागण्यांची खास ठरावाद्वारे दखल घेतली गेली.

आटपाडी तालुक्यातल्या जगमान्यता पावलेल्या साहित्यीकांच्या विविध ठिकाणच्या स्मारकांसाठी प्रत्येकी १०० कोटी रूपयांचा निधी व २५ एकर जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच गदिमांचे शेटफळे येथील अपूरे स्मारक पूर्ण करण्यात यावे.

आटपाडी तालुका साहित्यिकांचे माहेरघर आहे . या तालुक्याच्या ५ शब्दप्रभुंना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होताना पाहिले आहे . या छोट्या तालुक्याचा मराठी सारस्वतात एक सन्मान व्हावा म्हणून १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आटपाडी येथे घेण्यात यावे . त्यासाठी संपूर्ण माणदेशी जनता पाठीशी आहे . अशा आशयाच्या दोन्ही ठरावांना या साहित्यीक मेळाव्यात मान्यता देण्यात आली.

या मेळाव्यात साहित्यीक प्रा. डॉ. कृष्णा इंगोले, ज्ञानेश डोंगरे, शिवाजीराव बंडगर, सीताराम सावंत, तानाजीराव वाघमारे, सुधीर इनामदार, सुनिल दबडे, रमेश जावीर, हरीभाऊ गळवे, प्रा. बालाजी वाघमोडे, प्रा. विजय शिंदे प्रा श्रीकृष्ण पडळकर, चंद्रवर्धन लांडगे, सुखदेव नवले, व्ही. एन. देशमुख, अरविंद चांडवले, प्रा. संभाजीराव गायकवाड इत्यादी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हे ठराव मंजुर करण्यात आले.प्रारंभी प्रख्यात दिवंगत साहित्यीक भास्कर चंदनशिव यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. ग .दि . माडगुळकर स्मारक समिती शेटफळेचे अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ . सयाजीराजे मोकाशी आणि खजिनदार चंद्रकांत गायकवाड यांनी सादिक खाटीक यांनी केलेल्या लक्षवेधी, न्याय आणि यथायोग्य मागण्यांचे ठराव व्हावेत, यासाठी पुढाकार घेउन ठरावांना अनुमोदन दिले.

## म्हातोबा जोगेश्वरी मंदिर देवस्थानच्या पालखी मार्गाचे भुमिपूजन संपन्न

**हवेली ( प्रविण शेंडगे ) :-** आळंदी म्हातोबा, ता. हवेली, जि. पुणे येथे, थेऊर ग्रामपंचायत सदस्य आरोग्यदूत युवराज हिरामण काकडे यांच्या माध्यमातून, श्री म्हातोबा जोगेश्वरी मंदिर पालखी मार्ग रस्ता सुधारणा करणे, या १० लक्ष रू कामाचा भूमिपूजन समारंभ काल मंगळवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला. गेली अनेक वर्षांपासून या पालखी मार्गाचे काम प्रलंबित होते. येथील ग्रामस्थांनी याबाबत युवराज काकडे यांच्याकडे मागणी केली होती. ही मागणी तात्काळ मान्य करून युवराज काकडे यांनी १० लक्ष रू निधी उपलब्ध करून दिला.

या प्रसंगी आरोग्यदूत युवराज काकडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधताना, आळंदी गावच्या भविष्यातील महत्त्वाच्या विकासकामांवर लक्ष केंद्रीत करणार असल्याचे सांगितले. यामध्ये गावासाठीची ड्रेनेज लाईन योजना, कुंजीरवाडी- आळंदी मुख्य रस्ता, म्हातोबा मंदिर पुढील काळात (क) वर्गात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न, मल्हारगड पर्यटन क्षेत्र म्हणून विकास, विठ्ठल मंदिराजवळील नाला खोलीकरण, आरोग्य विषयक उपक्रम अशा विविध विकासकामांच्या माध्यमातून गावचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे युवराज काकडे यांनी सांगितले.

यावेळी युवराज काकडे यांनी आळंदी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास पुढील वर्षभर पुरतील येवढी, १ लक्ष रुपयांची गोळ्या औषधे उपलब्ध करून दिली. तसेच गावातील नागरिकांच्या आरोग्याविषयी सर्व चांगल्या सेवा सुविधा पुढील काळातही उपलब्ध करून देण्याबाबत सांगितले.

कार्यक्रमास दिलीप वाल्हेकर, अशोक जवळकर, संदेश आव्हाळे, भगवान जवळकर, मोहन जवळकर, दत्तात्रय जवळकर, शंकर जवळकर, वाल्मिक जवळकर, रतन झेंडे, भाऊसाहेब कुंजीर, संदीप पवार, श्रीपाद जवळकर, राजेश जवळकर, तेजस शिवरकर, गणेश जवळकर, योगेश जवळकर, राहुल जवळकर, अमित पवार, सागर पवार, ज्ञानेश्वर जवळकर, बाळासाहेब शिवरकर, विजय सुर्वे, गणपत जवळकर, कैलास खटाटे, दयानंद शिवरकर, दशरथ जवळकर, सखाराम जवळकर, श्रीहरी काळभोर, योगेश काकडे, प्रतिक शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

या भुमिपूजन सोहळ्याच्या माध्यमातून, गावच्या सर्वांगीण विकासाची ही महत्वाची शिदोरी असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त करून, युवराज काकडे यांचे आभार मानले.

# 'दिलखुलास'मध्ये सायबर सुरक्षेवर पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांची विशेष मुलाखत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित लोकप्रिय रेडिओ कार्यक्रम 'दिलखुलास'मध्ये 'सायबर सुरक्षा अभियान व जनजागृती' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर कोल्हापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

ही मुलाखत सोमवार दि.६, मंगळवार दि. ७, बुधवार दि. ८ आणि गुरुवार दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर ऐकता येणार आहे. तसेच ही मुलाखत ' ' या मोबाईल ॲपवरही उपलब्ध असणार आहे. या मुलाखतीचे सूत्रसंचालन सहायक संचालक वृषाली मिलिंद पाटील यांनी केले आहे.

डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे नागरिकांचे जीवनमान अधिक सुलभ झाले असले, तरी सायबर गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढत असल्याचे वास्तव आहे. ऑनलाईन फसवणूक, आर्थिक घोटाळे, ओटीपी व लिंकद्वारे होणारे गैरप्रकार, सोशल मीडियावरील दिशाभूल यामुळे सामान्य नागरिक अधिकाधिक धोक्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

**६ ते ९ ऑक्टोबरदरम्यान आकाशवाणीवर प्रसारण**



याच अनुषंगाने शासनाकडून सायबर सुरक्षेवर सातत्याने भर देण्यात येत असून, डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या माध्यमातून २५ सप्टेंबर रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे 'रिंग द बेल फॉर सिक्युरिटी' हे अभियान राबवण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत देशभरात सायबर सुरक्षा जनजागृती महिना साजरा करण्यात येत आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी सायबर सुरक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली आहे. यामध्ये सायबर गुन्ह्यांचे प्रकार, त्यापासून बचावासाठी घ्यावयाची खबरदारी, ऑनलाईन आर्थिक व्यवहार करताना पाळावयाचे नियम, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची दक्षता तसेच सायबर फसवणूक झाल्यास तातडीने करावयाची तक्रार प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्क राहावे, कोणत्याही संशयास्पद लिंक, कॉल किंवा संदेशांना प्रतिसाद देऊ नये आणि सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहावे, असे आवाहनही पोलीस अधीक्षक गुप्ता यांनी या कार्यक्रमातून केले आहे.

सायबर सुरक्षेच्या दृष्टीने उपयुक्त माहिती मिळवण्यासाठी 'दिलखुलास' कार्यक्रमातील ही विशेष मुलाखत सर्व नागरिकांनी आवर्जून ऐकावी, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.